माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ६२५१/२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सचिन दशरथ ढमढेरे | उप कार्यकारी अभियंता,महावितरण कंपनी मर्या.घोडेगाव उपविभाग घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, मंचर विभाग, ता.आंबेगाव, जि.पुणे |

**( सुनावणी दिनांक - २१/०७/२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.११.१०.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, अपुरी,दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व उत्तरवादी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.१७.०३.२०२३ च्या माहिती अर्जात मौजे पिंपळगाव तर्फे घोडे ता.आंबेगाव जि.पुणे येथिल गिता कोंडीबा बोऱ्हाडे यांच्या गट क्र.२६३ व २६६ मध्ये दिलेल्या व्यवसायिक वापराच्या विजपुरवठा जोडणीबाबत माहिती मागितलेली आहे.

उपलब्ध अभिलेखावरून जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.०८.२०२३ च्या पत्राने अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसुन येते. अपिलार्थी हे सदर सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकुण घेता आले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( मकरंद रानडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ पुणे.**

जावक क्र. ६२५१/२०२३/ पुणे 9537/2025

दिनांक -13/10/25